जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर ,वसई-विरार पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक ०६-२२ दिनांक ०५/०१/२०२२

# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्ताल कार्यक्षेत्रामध्ये नायलॉन मांजा वापरण्यावर बंदी

दरवर्षी बऱ्याच ठिकाणी “पतंग उत्सव” कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, नायलॉन मांज्यामुळे पक्षी व मानवी जिवीतास इजा झालेली आहे. नायलॉन मांजा हा प्लास्टिक किंवा कृत्रिम वस्तुंचा वापर करुन बनवण्यात आलेला व सर्वसाधारपणे अनाशवंत असल्याने तो बराच कालावधीकरिता निसर्गात साचुन राहतो. त्यामुळे पर्यावरणास हानी पोहोचते. नायलॉन मांजा हा जमिनीवर तसाच पडुन राहील्याने जनावरे विशेषः गाई, म्हशी इत्यादींच्या पोटात जावुन त्यांच्या जिवीतास धोका उत्पन्न होवु शकतो. त्यामुळे मानवी जिवीताचे तसेच पशू पक्षांचे नायलॉन मांजापासुन संरक्षण करणे गरजेचे आहे. नायलॉन मांजा हा पतंग उडविण्याच्या दरम्यान विदयुत वाहीनी तसेच उपकेंन्द्र या ठिकाणी अडकुन विदयुत पुरवठयामध्ये समस्या निर्माण करु शकतात. त्यामुळे कोणतेही अपकृत्य होवु नये याकरिता श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यक्षेत्राकरिता फौजदार प्रकिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये दिनांक ०५/०१/२०२२ रोजी ००.०१ पासुन ते दिनांक ०३/०२/२०२२ रोजी २४.०० वा. पावेतो नायलॉन मांजाचे उत्पादन, साठा, विक्री व वापर करण्यावर मनाई आदेश लागू केले आहे.